# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 28.03.2024** **वारःगुरुवार**

---

1.लोकसभा निवडणूकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत समाप्त
2.दुसऱ्या टप्प्यासाठीची अधिसूचना आज जारी होणार
3.आर्मी कमांडर्सची परिषद आजपासून नवी दिल्लीत
4.पीएचडीकरिता प्रवेश परीक्षेऐवजी नेट परीक्षेतल्या गुणांचा वापर करण्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाचे विद्यापीठांना निर्देश
5.मायामी खुल्या टेनिस स्पर्धेत रोहन बोपण्णा-मॅथ्यू ऍबडेन जोडी पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत दाखल

लोकसभा निवडणूकीच्या पहिल्या टप्प्यासाठी अर्ज दाखल करण्याचा काल अखेरचा दिवस होता. या टप्प्यात महाराष्ट्रात नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि गडचिरोला-चिमूर या जागांचा समावेश आहे. पहिल्या टप्प्यासाठी 19 एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत रामटेकमध्ये 51, नागपूरमध्ये 62, भंडारा- गोंदिया 49, गडचिरोली- चिमूर 19 आणि चंद्रपूरमध्ये 48 उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

नागपूरमधून भाजपाचे विद्यमान खासदार नितीन गडकरी आणि काँग्रेसचे विकास ठाकरे यांच्यात प्रमुख लढत होणार आहे. या मतदार संघात वंचित बहुजन आघाडीचा ठाकरेंना पाठिंबा असल्याचं जाहीर करण्यात आलं आहे.

रामटेकमध्ये शिवसेनेचे राजू पारवे आणि काँग्रेसच्या रश्मी बर्वे यांनी आणि भंडारा-गोंदिया मतदारसंघात भाजपचे विद्यमान खासदार सुनील मेंढे यांनी तर काँग्रेसकडून डॉ. प्रशांत पडोळे यांनी अर्ज आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. चंद्रपूरमधून सुधीर मुनगंटीवार आणि माजी दिवंगत खासदार बाळू धानोरकर यांच्या पत्नी प्रतिभा धानोरकर यांनी आपले अर्ज दाखल केले. चंद्रपूरमधूनच एकंदर २९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.

गडचिरोली-चिमूर मतदारसंघात भाजपाचे विद्यमान खासदार अशोक नेते, तर काँग्रेसकडून नामदेव किरसन यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या मतदारसंघात एकंदर १२ उमेदवारांचे अर्ज दाखल झाले आहेत.

अर्जांची छाननी आज होणार असून येत्या 30 तारखेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. अशी माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे.

दुसरा टप्पा

लोकसभा निवडणूकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीची अधिसूचना आज जारी होणार आहे. या टप्प्यासाठी 12 राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील 88 जागांसाठी तसंच मणिपूरच्या काही जागांसाठीही मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्यात केरळच्या २०, कर्नाटकातील १४, राजस्थानच्या १३, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्राच्या प्रत्येकी ८, मध्य प्रदेशच्या ७, आसाम आणि बिहारमधील प्रत्येकी ५, पश्चिम बंगाल आणि छत्तीसगडच्या प्रत्येकी ३ आणि मणिपूर, त्रिपुरा आणि जम्मू-काश्मीरमधील प्रत्येकी एका जागेसाठी मतदान होणार आहे. या सर्व राज्य आणि केंद्र शासित प्रदेशात 26 एप्रिल रोजी होणाऱ्या मतदानासाठी 4 एप्रिलपर्यंत अर्ज दाखल करता येतील तर जम्मू आणि काश्मीर वगळता अर्जांची छाननी 5 एप्रिलला होणार आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये 6 एप्रिल छाननी होईल.

आर्मी कमांडर्स परिषद

आर्मी कमांडर्सची परिषद आजपासून नवी दिल्लीत सुरु होत असून लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे आज कमांड मुख्यालयातून दूरस्थ पद्धतीने कमांडर्सना संबोधित करतील. तर संरक्षण मंत्री राजनाथ सिंग या परिषदेला 2 एप्रिल रोजी संबोधित करणार आहेत.

क्षेत्रीय लष्कर आणि माजी सैनिकांचं कल्याण यावरील महत्वपूर्ण विषयांवर या परिषदेत चर्चा होणार आहे. कार्यात्मक परिणामकारकता वृद्धिंगत करणं, नवोन्मेषाचं महत्व आणि भविष्यातील आव्हानांसाठी सज्जतेची खात्री करण्याकरिता प्रशिक्षण आणि विकास कार्यक्रमांमध्ये गुंतवणूक करणं हे परिषदेत चर्चिले जाणारे अन्य मुख्य विषय असतील. यानंतर लष्कर गट विम्याच्या गुंतवणूक सल्लागर समितीची बैठक लष्कर प्रमुखांच्या अध्यक्षतेखाली होणार असून वर्तमान सैनिक, माजी सैनिक आणि त्यांचे कुटुंबीय यांच्या वित्तीय सुरक्षिततेसाठी विविध कल्याणकारी उपाय आणि योजनांवर या बैठकीत चर्चा होणं अपेक्षित आहे. देशांतली एकंदर सुरक्षितता परिस्थितीचा आढावा घेऊन भारतीय लष्कर प्रगतीशील, भविष्यवेधी राहण्याची खात्री करण्याच्या दृष्टिनं आर्मी कमांडर्स परिषदेचं विशेष महत्व आहे.

**<u>युक्रेन-परराष्ट्रमंत्री</u>**

आंतरराष्ट्रीय स्तरावर आपलं म्हणणं मांडू शकणारा आणि ते ऐकलं जात असणारा भारत हा एक महत्वाचा आपला भागीदार देश असल्याचे गौरवोद्गार युक्रेनचे परराष्ट्रमंत्री दिमित्रो कुलेबा यांनी काल काढले. दिमित्रो कुलेबा दोन दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी आज नवी दिल्लीत येत आहेत. परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर यांच्या आमंत्रणावरुन ते भारत भेटीवर येत आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्री आणि राष्ट्रीय सुरक्षा उपसल्लागार यांची ते भेट घेतेल. दोनही देशांदरम्यानचे प्रादेशिक आणि जागतिक प्रश्न तसंच द्विपक्षीय सहभाग आणि सहकार्य या विषयावर चर्चा अपेक्षित आहे. अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयानं दिली आहे. युक्रेनच्या परराष्ट्र मंत्र्यांचा गेल्या सात वर्षातील हा पहिला भारत दौरा आहे.

**रशिया-मृत्युसंख्या**

रशियाची राजधानी मॉस्कोमध्ये गेल्या आठवड्यात एका सभागृहात झालेल्या गोळीबारातील मृतांची संख्या 143 वर पोहोचली आहे. अद्याप 80 जखमींवर उपचार सुरु असल्याचं रशियन अधिकाऱ्यांनी सांगितलं. क्रोकस सिटी हॉल इथं रात्रीच्या वेळी झालेला हा गोळीबार रशियन भूमीवर गेल्या दोन दशकात झालेला सर्वात घातक दहशतवादी हल्ला होता. किमान चार बंदूकधाऱ्यांनी स्वयंचलित रायफल्समधून या हॉलमध्ये जमलेल्या हजारो संगीतप्रेमींवर अंदाधुंद गोळीबार केला आणि त्या ठिकाणी आग लावली. इस्लामिक स्टेटशी संबंधित एका गटानं आपण हा हल्ला केल्याचा दावा केला आहे, अमेरिकेनंही हा गट गोळीबाराला जबाबदार असल्याचा दुजोरा दिला आहे.

**लष्करप्रमुख**

आत्मनिर्भरता ही भविष्यातील धोरणात्मक गरज असल्याचं लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांनी सांगितलं. देशांत शस्त्रास्त्र आणि दारुगोळा पुरेशा प्रमाणात उत्पादित होणं आवश्यक आहे. एका खासगी वाहिनीनं आयोजित केलेल्या संमेलनाला संबोधित करताना ते बोलत होते. संरक्षण क्षेत्रात स्वत:ची क्षमता विकसित करण्यावर पुरेसा भर दिला जात असल्याचं जनरल पांडे यावेळी म्हणाले. भारतीय सैन्यदल कोणत्याही आव्हानाला तोंड देण्यास तयार असून सर्व स्तरावर मोहिमा करण्याची आपल्या जवानांची तयारी असल्याची खात्री त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना दिली. भारतानं आपल्या उत्तर सीमेवरील क्षमता विकासावर तसेच पायाभूत सुविधांच्या विकासावर लक्ष केंद्रित केलं आहे; असंही पांडे यांनी सागितलं.

**दिल्ली**

दिल्लीचं प्रशासन तुरुंगातून चालवलं जाणार नाही असं दिल्लीचे उपराज्यपाल विनयकुमार सक्सेना यांनी स्पष्ट केलं. दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून अरविंद केजरीवाल तुरुंगातून कामकाज पाहतील असं विधान आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी केल्यानंतर उपराज्यपालांनी हे स्पष्टीकरण एका खासगी वाहिनीवरील संमेलनात बोलताना दिलं.

सक्तवसुली संचालनालयानं या महिन्याच्या 21 तारखेला केजरीवाल यांना दिल्ली उत्पादन शुल्क धोरणाशी संबंधित पैशांचा गैरव्यवहार केल्याच्या प्रकरणात अटक केली आहे.

**युजीसी-पीएचडी**

सर्व विद्यापीठांनी 2024 - 2025 या शैक्षणिक वर्षापासून, पीएचडीकरिता प्रवेश परीक्षा घेण्याऐवजी नेट परिक्षेतील गुणांचा वापर करावा असे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगानं दिले आहेत. आयोगाचे अध्यक्ष मामीडाला जगदीश कुमार यांनी काल समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये ही माहिती दिली. जून २०२४ सत्रासाठी नेट अर्ज प्रक्रिया पुढील आठवड्यापासून सुरु होण्याची अपेक्षा असून, राष्ट्रीय चाचणी संस्था त्यावर काम करत असल्याचंही जगदीश कुमार म्हणाले.

**माद्रिद-खुल्या बॅडमिंटन**

स्पेनमध्ये सुरु असलेल्या माद्रिद खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी व्ही सिंधू नं महिला एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.आज तिचा सामना तैवानच्या हुआंग यू-सुनशी होणार आहे. पुरुष

दुहेरीत भारताच्या कृष्ण प्रसाद गर्ग आणि साई प्रथीक या जोडीनं कॅनडाच्या खेळाडूंना पराभूत करत उप उपांत्यपूर्व फेरीत गाठली आहे. महिला दुहेरी स्पर्धेत तनिषा कॅस्ट्रो आणि अश्विनी पोनप्पा या जोडीचा सामना आज उपउपांत्यपूर्व फेरी ऑस्ट्रेलियाच्या टिफनी हो आणि ग्रोनिया सोमरविले यांच्याशी होईल. मित्र दुहेरी प्रकारांत एन सिक्की रेड्डी आणि बी सुमीत रेड्डी यांनीही उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

**<u>मायामी-खुल्या-टेनिस-स्पर्धे</u>**

फ्लोरिडामध्ये मायामी इथं सुरु असलेल्या मायामी खुल्या टेनिस स्पर्धेत भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याचा ऑस्ट्रेलियन सहकारी मॅथ्यू एबडेन आज पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत स्पेनच्या मार्सेल ग्रॅनॉलर्स आणि अर्जेंटिनाच्या होरासिओ झेबॅलोस यांच्याशी होणार आहे.

कालच्या उपांत्यपूर्व फेरीत बोपन्ना आणि मॅथ्यूनं - सेम व्हर्बीक आणि ऑसी जॉन-पॅट्रिक स्मिथ यांचा ३-६, ७-५, १०-७ असा पराभव केला. या विजयामुळे आंतरराष्ट्रीय टेनिस नामांकनांतील दुहेरी क्रमवारीत बोपण्णाचे स्थान पहिल्या 10 मध्ये आलं आहे. यामुळे पॅरिस ऑलिम्पिकसाठी तो पात्र ठरण्याची शक्यता आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

## नमस्कार.